जाहिरात क्र. -८४- - , दि.२३/०५/२०२०

# पुणे महानगरपालिका
## जाहिरात प्रकटन

आरोग्य कार्यालयाअंतर्गत खालील अस्थायी पदावर पंचेचाळीस दिवसांकरिता, करार पद्धतीने, एकवट मानधनावर सेवा घ्यावयाची असल्याने अनुभवधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदाचे नाव | एकवट मासिक मानधन रुपये | शैक्षणिक अर्हता | अनुभव | एकुण पदांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी (वर्ग-२) | ६०००० | मान्यता प्राप्त विद्यापीठाची वैद्यकीय पदवी (एम.बी.बी.एस.) | शासकीय/ निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य/ संस्थेकडील/ खाजगी रुग्णालायाकडील संबंधित कामाचा ०३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य | २०० |
| २. | वैद्यकीय अधिकारी (आयुर्वेदिक) (वर्ग-२) | ४०००० | शासनमान्य विद्यापीठाची/ संस्थेची आयुर्वेद शाखेची पदवी (बी.ए.एम.एस) | संबंधित कामाचा ३ वर्षाचा अनुभव | १०० |
| ३. | आरोग्य निरीक्षक (वर्ग-३) | २२३४९ | अ) माध्यमिक शाळांत परीक्षा (एस.एस.सी.) उत्ती र्ण आणि स्वच्छता निरीक्षक पदविका उत्तीर्ण.<br>ब) शास्त्र शाखेच्या पद्विधार्कास प्राधान्य. | संबंधित कामाचा ५ वर्षाचा अनुभव | ५० |
| ४. | निरीक्षक (हिवताप) (वर्ग-३) | २२३४९ | अ) माध्यमिक शाळांत परीक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण किंवा समकक्ष अर्हता.<br>ब) प्राणी शास्त्र किंवा सुक्ष्मजीव शास्त्रातील पदवीधरास प्राधान्य.<br>क) शासनाचा बहुउद्देशीय कर्मचाऱ्यासाठी विहित केलेल्या किमान १२ महिन्यांच्या प्रशिक्षण पाठ्यक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>ड) जिल्हा परिषदेकडील संबंधित कामाचा अनुभंव असलेल्या उमेदवारास प्राधान्य. | | ५० |
| ५. | ज्युनियर नर्स (वर्ग-३) | २२३४९ | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची १२ वी ची विज्ञान शाखेतील परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची जनरल नर्सिंग व मिडवाईफरी या विषयाची पदविका.<br>क) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक. | शासकीय/ निमशासकीय/ खाजगी रुग्णालयातील परिचारिक म्हणून ०५ वर्षाचा अनुभव आवश्यक. | १५० |
| ६. | परिचारिका (ए.एन.एम.) (वर्ग-३) | १९२५० | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाची माध्यमिक शाळांत परीक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण.<br>ब) शासन मान्यता प्राप्त संथेची | शासन मान्यता प्राप्त संस्थेची ए.एन.एम. अभ्यासक्रम पूर्ण व त्यानंतर कामाचा ०३ वर्षाचा | १५० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | ए.एन.एम. अभ्यासक्रम पूर्ण.<br>क) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक. | अनुभव आवश्यक. | |
| ७. | औषध निर्माता (वर्ग-३) | २२३४९ | अ) उच्च माध्यमिक शाळांत परीक्षा (विज्ञान शाखा) उत्तीर्ण<br>ब) औषध निर्माण शास्त्रातील पदविका. (डी.फार्म)<br>क) औषध निर्माण शास्त्रातील पदवीधर उमेदवारास प्राधान्य | संबंधित कामाचा ०३ वर्षाचा औभाव आवश्यक | २५ |
| ८. | प्रयोगशाळा तंत्रज्ञ (वर्ग-३) | २२३४९ | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची रसायनशास्त्र, जीवशास्त्र वा सूक्ष्मजीव शास्त्र या विषयातील पदवी.<br>ब) मान्यताप्राप्त संथेची डी.एम.एल.टी. परीक्षा उत्तीर्ण. | वैद्यकीय प्रयोगशाळेतील किमान ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक. | ५० |
| ९. | प्रयोगशाळा सहाय्यक (वर्ग-३) | १८२५० | अ) उच्च माध्यमिक शाळांत परीक्षा उत्तीर्ण व मान्यता प्राप्त संस्थेची डी.एम.एल.टी. पदवी.<br>ब) शास्त्र शाखेचा पदवीधर आणि डी.एम.एल.टी. पदवीधारकास प्राधान्य. | | ५० |
| १० | ई. सी. जी. टेक्निशियन (वर्ग-३) | २२३४९ | अ) मान्यता प्राप्त रसायनशास्त्र, जीवशास्त्र वा सूक्ष्मजीव शास्त्र या विषयातील पदवी. | | ३० |
| ११ | सहाय्यक दवाखाना (वर्ग-३) | १८२५० | माध्यमिक शाळांत परीक्षा (एस.एस.सी) उत्तीर्ण किंवा समकक्ष अर्हता | दवाखण्याकडील कामाचा ०३ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक | ५० |
| १२ | आया (वर्ग-४) | १६२५० | इ. ८ वी उत्तीर्ण | | १०० |
| १३ | परिचारक/ नर्सिंग ऑर्डर्ली (वर्ग-४) | १६२५० | माध्यमिक शाळांत परीक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण किंवा समकक्ष अर्हता. | | १०० |

**अटी –** १. वयोमर्यादा : खुल्या वर्गातील उमेदवाराचे वय जाहिरातीचे दिनांकास ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी वयोमर्यादा ५ वर्षाने शिथिल असेल. २. वरील शैक्षणिक पात्रता व अनुभव आवश्यक. ३. सदरचे पद अत्यंत अस्थायी स्वरूपाचे आहे. ४. सदर पदाच्या नेमणुका ऑब्जेक्टीव्ह असेसमेंट (objective assessment) पद्धतीने करण्यात येईल. ५. उमेदवारांनी पात्रता व अनुभवाच्या मूळ कागदपत्रांसह हजर राहणे आवश्यक आहे. ६. उमेदवारांनी एक पासपोर्ट आकाराचा फोटो व आवश्यक मूळ कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रतीचा एक संच सादर करणे आवश्यक आहे. ७. अर्ज करताना उमेदवारांची जन्मतारखेच्या पुराव्यासाठी जन्मतारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित प्रत अथवा जन्मतारखेची नोंद असलेली शाळांत परीक्षेच्या उत्तीर्ण सर्टिफिकेटची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक. ८. उमेदवार मागासवर्गीय असल्यास जातीचा स्पष्ट उल्लेख करून कोणत्या प्रवर्गात मोडत आहे याचा उल्लेख करावा. ९. अर्जदार महिला असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे (शासनमान्य). १०. विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज अपूर्ण किंवा चुकीचे भरलेले अर्ज, वय शैक्षणिक अर्हता गुणपत्रक, जातीचा दाखला, अनुभव इ. संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्य प्रती (ट्रु- कॉपी) जोडले नसलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील. ११. निवड झालेल्या उमेदवारांना विहित नमुन्यात करारनामा करून फक्त **४५ दिवसांसाठी** नेमणूक दिली जाईल. १२. येणाऱ्या उमेदवारांनी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. १३. वरील पद हे अस्थायी स्वरूपाचे असल्याने या पदावर कायमस्वरूपाची नियुक्ती मागण्याचा हक्क असणार नाही. १४. वरील पदासाठी कामाचे स्वरूप ठरविण्याचे अधिकार मा. खातेप्रमुख यांना राहील. १५. सदर पदांना दररोज ८ तास (रुग्णालयाच्या सोयीनुसार) सेवा देणे बंधनकारक असेल तथापी पदांची कामकाजाची वेळ निश्चित करण्याचे अधिकारी खातेप्रमुख यांचे असतील. १६. अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. १७.

बोलविलेल्या उमेदवारास नियुक्ती देण्याबाबतचे सर्व अधिकारी मा. महापालिका आयुक्त यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत. या बाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही. १८. रिक्त पदांच्या संख्येत कमी/ जास्त बादल होण्याचो शक्यता आहे. त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. पदांची संख्या समांतर आरक्षण या बाबत बदल करणे, मुलाखत स्थगित करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे या बाबतचे सर्व अधिकारी मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका हे स्वतःकडे राखून ठेवतील. या बाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही. १९. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार अर्हताधारण करणारा न आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी आपोआप रद्दबातल होईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल. २०. निवड झालेल्या उमेदारास सेवेत रुजू होण्यापूर्वी एका महिन्याचे मानधन अनामत रक्कम म्हणून भरावे लागेल व त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

वरील प्रमाणे शैक्षणिक पात्रता व अनुभावधारक उमेदवारांनी दि. १५/०५/२०२० रोजी दुपारी ३:०० वा. पासून ते दि. २७/०५/२०२० रोजी दुपारी ३:०० वा. पर्यंत विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतींसोबत **mohcontract@punecorporation.org** या मेल वर **स्कॅन करून** (pdf **करून**) पाठवावे. उमेदवाराने सादर करावयाचा विहित नमुन्यातील अर्ज **punecorporation.org** या संकेतस्थळावर प्राप्त होईल.

(डॉ. अंजली साबणे)
सहा. आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका

(डॉ. रामचंद्र हंकारे)
आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका

# उमेदवाराने करावयाचा अर्जाचा ननुना

प्रति,
मा. महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका
पुणे– ४११००५.

विषयः– जाहिरात क्र. -------- नुसार मानधनावरील--------------------या पदासाठी अर्ज.

मा. महोदय,

संदर्भीय जाहिरातीनुसार मी मनपाचे रुग्णालय / दवाखान्यामध्ये पंचेचीळीस दिवसांच्या कालवधीकरींता करार पध्दतीने दरमहा एकवट मानधनावर ------------------ या पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असून या पदासाठी निवड होण्याकरीता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

आडनाव स्वतःचे नाव वडील/पतीचे नाव

१) **संपूर्ण नावः** ----------------------------------------------

२) **पत्रव्यवहाराचा पत्ताः** ----------------------------------------------

----------------------------------------------

३) **ई–मेल आय डी** ------------------------------ **मोबाईल क्रमांक** ------------------

४) **जन्म तारीखः** **दि. / /**

५) **लिंगः** **पुरुष / स्त्री**

६) **जातः** ---------------------

| SC | ST | OBC | VJ-A | NTC | OPEN | | |
|---|---|---|---|---|---|---|---|

७) **अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशील –**

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | संस्था | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

८) **तांत्रिक व इतर अर्हता तपशीलः** १) ---------------------------------

२)--------------------------------

९) **अनुभवाचा तपशील –**

| अ.क्र | संस्थेचे नाव | संस्थेचा पत्ता दूरध्वनीसह | पद | कालावधी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

वर नमूद केलेला तपशील खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चूकीची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे नोकरीवरुन कमी करण्यात पात्र राहीन व त्याबाबत माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

**स्थळः** **अर्जदराची सही** -----------------------

**दिनांकः** **अर्जदाराचे नाव** ------------------------

**सहपत्रे – अर्जसोबत खालील प्रमाणपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.**

**१) शैक्षणिक व इतर अर्हतेची प्रमाणपत्र २) अनुभवाचे प्रमाणपत्र ३) जात प्रमाणपत्र**

**४) अद्ययावत रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र ५) इतर कागदपत्रे -------**